जा.क्र. जि.प.आरोग्य /बो डॉ/१८/१२
आरोग्य विभाग जि.प. नाशिक
दि. ०७/०६/२०१२

प्रति

व्यवस्थापक
दै. दिव्य मराठी
नाशिक

विषय :- दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रातील दि. ६/६/१२ रोजीच्या "क्रॉस पॅथी प्रॅक्टीस करणाऱ्यावर आता नजर" या बातमी बाबत खुलासा

वरील विषयानुसार संबंधीत बातमीमध्ये होमियोपॅथी आयुर्वेद , युनानी व तत्सम पॅथीच्या डॉक्टरकडून क्रॉस पॅथीची प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरवर संबंधीत पदवी देणाऱ्या परिषदेमध्ये प्रस्ताव पाठवून कार्यवाही करण्याचे आदेश राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने दिले आहेत. अशा प्रकारची बातमी पसिध्द झाली आहे. या अनुषंगाने सदरची बातमी देताना होमियोपॅथीक पदवीधारक (BHMS DHMS) वैद्यकीय व्यावसायिक Allopathic औषधीची प्रॅक्टीस करत असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यास महाराष्ट्र होमियोपॅथीक परिषद ही संस्था सक्षम आहे असा खुलासा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांचेकडून दि. २४/५/१२ रोजी प्राप्त झाला आहे.

तथापि बातमीमध्ये आयुर्वेद युनानी व तत्सम पॅथीचा उल्लेख असल्यामुळे (National Integrated Medical Association)NIMA नाशिक शाखे व्दारा दिलेल्या लेखी पत्रान्वये आयुर्वेद व युनानी व्यावसायिकामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे नमुद केले आहे, त्या अनुषंगाने भारतीय चिकीत्सा पध्दत (आयुर्वेद , युनानी व सिध्द) अंतर्गत अंतर्भूत व्यावसायिक, त्यांना मिळणाऱ्या आधुनिक चिकीत्सा प्रशिक्षणानुसार आधुनिक चिकीत्सा पध्दतीचा वापर करु शकतात असे महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५/११/९२ मध्ये नमुद आहे.

महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र ममाअ २००६ /५३/प्रक्र ११/०६ /अधिनियम वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग मंत्रालय मुंबई दि. २८/०५/२००७ नुसार महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम १९६१ च्या अनुसूचिप्रमाणे ए, ए-१, बी, डी या शेडयुलमध्ये नोंद असलेल्या आयुर्वेद पदवीधारकांना ॲलोपॅथीक वैद्यकीय व्यवसाय करण्यास अनुमती आहे असे नमुद केलेले आहे.

असा खुलासा आपल्या वृत्तपत्रात देंण्यात यावा.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत डॉ. तुषार सुर्यवंशी अध्यक्ष निमा नाशिक शाखा यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र शासन

संकीर्ण 0512 /159/2012/अधिनियम

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग/अधिनियम

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक.

मंत्रालय, मुंबई 400 032

दि :- २८ मे, २०१२

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, नाशिक.

विषय :- होमियोपॅथीक (BHMS,DHMS) पदवीधारक वैद्यकीय व्यावसायिक अॅलोपॅथीक पॅथीचा वापर करीत असल्याबाबत..

महोदय

उपरोक्त विषयाबाबतचे आपल्या कार्यालयाचे पत्र क्र जि.प.आरोग्य / होमियोपॅथी/आयु /12 ,दि.3.05.2012 च्या पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार विषयांकीत वैद्यकशास्त्रातील पदवीधारक वैद्यकीय व्यवसाय करताना आरोग्य विज्ञान पॅथीमधील (health science) औषधाचा वापर करण्याबाबत कायदेशीर कारवाई करण्यास महाराष्ट्र होमियोपॅथीक परिषद ही संस्था सक्षम आहे.

सबब, विषयांकित अपराध्याविरुध्द उपरोक्त परिषदेकडे तक्रार करावी अथवा त्याअनुषंगाने कारवाई प्रस्तावित करावी

आपला,

(सही)

(शि. म. दळवी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

आरोग्य विभाग
जिल्हा परिषद, नाशिक
शाखा:- डॉ. कराड
04 JUN 2012
क्र.अ. प्र.अ. जि.आ.अ.

डॉ. कराड

[redacted]

ई ९२०

2012

९५९/१२/आ.दि.

२१/५/१२

जा.क्र. जि.प.आरोग्य /होमिओपॅथी/आयु/१२
आरोग्य विभाग जि.प. नाशिक
दि. ०३/०५/२०१२

प्रति,

मा. स[redacted]
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग
मंत्रालय, मुंबई 400032

विषय :- होमियोपॅथीक (BHMS DHMS) पदवीधारक वैद्यकीय व्यावसायिक अलोपॅथिक औषधीचा वापर करीत असलेबाबत.

संदर्भ :- १) श्री. हितेश खैरनार सचिव इलेक्ट्रोपॅथी असोसिएशन ऑफ नासिक यांचा तक्रार अर्ज दिनांक १२/०४/२०१२

महोदय,

उपरोक्त विषयानुषंगाने श्री. डॉ. हितेश खैरनार सचिव इलेक्ट्रोपॅथी असोसिएशन नासिक यांनी संदर्भीय अर्जाद्वारे तक्रार केली आहे की, होमियोपॅथी (BHMS DHMS LCEH) पदवीधारक ॲलोपॅथीक प्रॅक्टीस करत आहेत तेव्हा ते बोगस डॉक्टर आहेत. त्यांच्या विरुद्ध विभागाने काय कार्यवाही केली आहे ? असे पुनस वर्मा विरुद्ध अश्विन पटेल यांच्या दि. १०/०५/१९९६ च्या सुप्रीम कोर्टाचा दाखला देऊन विचारणा केली आहे.

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण औषधी व द्रव्य विभाग परिपत्रक क्र. एसीएच २००२/२८८६/प्र.क्र. ४८७/०१/अधिनियम मंत्रालय मुंबई दिनांक ०४/०२/२००२ च्या परिपत्रकानुसार होमियोपॅथी औषधी पध्दतीमधील मान्यताप्राप्त अर्हता धारण करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाने मुंबई होमियोपॅथीक प्रॅक्टीशनर्स ॲक्ट १९५९ मधील कलम २०(१२) (अ) मधील तरतुदीनुसार केवळ होमिओपॅथी मध्येच व्यवसाय करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.

परंतु जे होमियोपॅथीक वैद्यकीय व्यावसायिक ॲलोपॅथीक औषधीचा वापर करुन वैद्यकीय व्यवसाय करतात त्यांच्या विरुद्ध कोणी व कोणती कार्यवाही होणे अपेक्षित आहे ? याबाबत मार्गदर्शन व्हावे ही विनंती.

सोबत : तक्रार अर्जाची छायांकीत प्रत

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत माहितीस्तव सादर
मा. जिल्हाधिकारी, नासिक
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नासिक
प्रत श्री.हितेश खैरनार सचिव इलेक्ट्रोपॅथी असोसिएशन नासिक

स्वाक्षरीत
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

२४७
१८-४-१२

२५/५/१२